१

## महाराष्ट्र शासन

क्रमांक : अधापु-२०१४/प्र. क्र. ५६/नापु-२२
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १४ जून, २०१४.

प्रति,

१) जिल्हाधिकारी (अमरावती/ नंदुरबार/ उस्मानाबाद)
२) जिल्हा पुरवठा अधिकारी (अमरावती/ नंदुरबार/ उस्मानाबाद)

विषय :-राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत ३ जिल्ह्यांतील प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थ्यांसाठी माहे जून, २०१४ करिता ज्वारी व मका यांचे नियतन त्याच प्रमाणात गव्हाच्या नियतनात बदल करुन करण्याबाबत.

संदर्भ :- १) केंद्र शासनाचे पत्र क्र.१-३/२०११-बीपी-III, दि. ३.०२.२०१४.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र.१-३/२०११-बीपी-III, दि. १९.०३.२०१४.
३) केंद्र शासनाचे पत्र क्र.१-३/२०११-बीपी-III, दि. ५.०६.२०१४.
४) राज्य शासनाचे पत्र क्र. असुका-२०१४/प्र.क्र.४३/नापु-२२, दि. ३०.०४.२०१४

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत उपरोक्त संदर्भाधीन क्र. ४ च्या पत्रान्वये माहे जून, २०१४ ते सप्टेंबर, २०१४ या कालावधीकरीता अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थ्यांकरीता जिल्हानिहाय मासिक नियतन मंजूर करण्यात आलेले आहे.

आता केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त क्र. १, २ व ३ येथील पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेल्या ज्वारी व मक्याच्या नियतनानुसार माहे जून, २०१४ करीता अमरावती, उस्मानाबाद व नंदुरबार या जिल्ह्यांतील प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थ्यांकरीता मंजूर करण्यात आलेल्या गव्हाचे नियतन कमी करुन तेवढयाच प्रमाणात ज्वारी व मक्याचे नियतन व गव्हाचे सुधारित मासिक नियतन सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे. इतर जिल्ह्यांकरिता दि. ३०.०४.२०१४ च्या पत्रान्वये गहू व तांदळाचे तसेच अमरावती, उस्मानाबाद व नंदुरबार या जिल्ह्यांचे दिलेले तांदळाचे नियतन कायम राहील.

सदर ज्वारी व मका वितरीत करण्याचे दर पुढीलप्रमाणे राहतील :-

| | **प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थी** (दर प्रति क्वि.) |
|---|---|
| केंद्रीय विक्री दर | १०० |
| बर्हिगोदाम दर | ५० |
| दुकानदारांचे मार्जिन | ५० |
| किरकोळ दर | १०० |

माहे जून, २०१४ च्या मंजूर करण्यात आलेल्या मका व ज्वारीच्या नियतनाची रक्कम जमा करणे व धान्याची उचल करण्याकरिता वैधता कालावधी (Validity Period) केंद्र शासनाच्या पत्राच्या दिनांकापासून (दि.५.०६.२०१४ पासून) ५० दिवसांचा असेल. तथापि सदर उचल ही तातडीने करण्यात यावी. सदर ज्वारी

व मक्याची उचल कोणत्या जिल्ह्यातून करण्यात यावी याबाबतचा तपशील विरिणपत्र "ब" मध्ये दर्शविण्यात आला आहे.

याव्यतिरिक्त संदर्भाधिन दि. ३०.०४.२०१४ च्या शासन पत्रान्वये दिलेल्या सूचना सदर सुधारीत नियतनाकरितादेखील कायम राहतील.

( हेमंत वाडीकर )
कक्ष अधिकारी

सोबत :- (विवरणपत्र "अ" व "ब")

प्रत :

१) सर्व उप आयुक्त (पुरवठा), नाशिक, औरंगाबाद, अमरावती.

त्यांना सूचित करण्यात येते की, माहे जून, २०१४ करीता ज्वारी, मका व गव्हाच्या (सुधारित) नियतनाचे आदेश सर्व संबंधित जिल्ह्यांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्ह्यांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे, याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील संबंधित जिल्ह्यांमध्ये नियतनानुसार धान्याची उचल होत असल्याची व त्याबाबतची माहिती "महाफूड" आज्ञावलीत दर आठवड्यात भरली जाण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.

२) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.

प्रस्तुत नियतनानुसार जिल्ह्यांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील "महाफूड" आज्ञावलीद्वारेच प्राप्त करुन घ्यावा.

३) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात यावा.

४) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

५) कार्यासन अधिकारी (नापु-२८), मंत्रालय, मुंबई यांना केंद्र शासनाच्या मूळ पत्राच्या प्रतीसह पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

६) निवडनस्ती कार्यासन नापु-२२, मंत्रालय, मुंबई.

( हेमंत वाडीकर )
कक्ष अधिकारी

सोबत : (विवरणपत्र "अ" व "ब")

## विवरणपत्र अ

(शासन पत्र क्र.असुका-२०१४/प्र.क्र.५६/नापु-२२ दि. १४.०६.२०१४ सोबतचे विवरणपत्र)

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यासाठी माह जून, २०१४ करिता सुधारित नियतन

| अ.क्र. | जिल्हा | नियतन (मे.टन.) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | दि.३०.०४.२०१४ च्या आदेशान्वये दिलेले गव्हाचे नियतन | ज्वारी | मका | गव्हाचे सुधारित नियतन |
| १ | नंदूरबार | १२८५ | ० | ३० | १२५५ |
| २ | अमरावती | ३९२१ | ८०.८ | १०० | ३७४०.२ |
| ३ | उस्मानाबाद | २९०१ | ४.७ | ० | २८९६.३ |
| | एकूण | ८१०७ | ८५.५ | १३० | ७८९१.५ |

## विवरणपत्र ब

| अ.क्र. | जिल्हा | ज्वारी (मे.टन) | Districts from where allocation can be made available | | मका(मे.टन) | Districts from which allocation can be made available | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जिल्हा | (MT) | | जिल्हा | Quantity (MT) |
| १ | नंदूरबार | ० | | ० | ३० | नंदूरबार | ३० |
| २ | अमरावती | ८०.८ | अमरावती | ८०.८ | १०० | अमरावती | १०० |
| ३ | उस्मानाबाद | ४.७ | उस्मानाबाद | ४.७ | ० | | ० |
| एकूण | | ८५.५ | | ८५.५ | १३० | | १३० |

## GOVERNMENT OF MAHARASHTRA

No. ASUKA-2014/ C.R. 56/C.S. 22
Food, Civil Supplies and Consumer Protection Department,
Mantralaya, Mumbai- 400 032,
Dated: 14th June, 2014.

To,

The General Manager,
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD, Complex,
Dattapada Road, Rajendra Nagar,
Borivali (East), Mumbai- 400 066.

**Sub :- Allocation of Jower, Maize and revised Wheat for Priority Households under NFSA for the month of June, 2014.**

Ref:- 1) Govt. of India letter No. 1-3/2011-BP –III, Dt. 3.02.2014.
2) Govt. of India letter No. 1-3/2011-BP –III, Dt. 19.03.2014.
3) Govt. of India letter No. 1-3/2011-BP –III, Dt. 5.06.2014.
4) State Govt. letter no. Asuka-2014/CR 43/CS 22, dated. 30.04.2014

Sir,

District wise Allocation for the month of June, 2014 to September, 2014 under NFSA is issued vide above referred letter dated 30.04.2014. Government of India vide its above referred letter dated 3.02.2014, 19.03.2014 and 5.06.2014 has sanctioned allocation of Jowar and Maize for under NFSA by substituting same quantity of wheat. Accordingly State Government has issued district wise allocation of Jowar, Maize and revised wheat for 3 districts in the State for the month of June, 2014.

2. The allocation of Jowar and Maize is sanctioned by reducing the equal quantity of wheat allocation for the above said 3 districts for the said months. The district wise allocation of Jowar, Maize and revised allocation of wheat is shown in Annexure-A and the places for the lifting of Jowar and Maize for each of the 3 districts is shown in Annexure- B of the allocation order dated 14.06.2014 which is attached herewith.

Yours faithfully,

**(Hemant Wadikar)**
Section Officer,

Copy to : Collection, CS-22.